


कुंभोज येथील हजरत पीर राजेबागस्वार पंजा व इचलकरंजीतील वेताळ पेठेतील नाले हैदर पंजा यांची भेट झाली.

# इचलकरंजी येथे पंजांची भेट

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** इचलकरंजी शहर व परिसरात मोहरम सणाची सुरुवात झाली. बुधवारी कुंभोज (ता. हातकणंगले) येथील हजरत पीर राजेबागस्वार पंजा व इचलकरंजीतील वेताळ पेठेतील नाले हैदर पंजा यांची मुलाखत (भेट) झाली. यावेळी मोठ्या संख्येने भागातील नागरिक उपस्थित होते.

वेताळ पेठ येथे अनेक वर्षांपासून मोहरम सणात परंपरेनुसार नाले हैदर पंजाची स्थापना करण्यात येते. अत्यंत जागृत व सर्वधर्म समभावाचे प्रतीक मानल्या जात असलेल्या या पंजाची स्थापना यंदा मोठ्या उत्साहात करण्यात आली. या पंजाच्या भेटीसाठी कुंभोज येथील हजरत पीर राजेबागस्वार पंजा दरवर्षी मुलाखतीसाठी येतो. यंदाही परंपरेनुसार या दोन्ही पंजांची भेट झाली.

इचलकरंजीत मंगळवारपासून मोहरम सणाची सुरुवात झाली आहे. शहरात विविध ठिकाणी वेगवेगळ्या पंजांची तर हजरत मख्तुमवली दर्गा आणि हजरत सिकंदर दर्गा याठिकाणी ताबुतची स्थापना करण्यात आली आहे. शनिवारी खत्तलरात्र असून, याचदिवशी नैवेद्य दाखविणे आणि रात्री खाई फोडण्याचा पारंपरिक कार्यक्रम होईल. रविवारी पहाटे शहर व परिसरातील सर्वच पंजे व ताबुत यांची गावभागात पारंपरिक पध्दतीने गाठभेट होईल आणि त्यानंतर सायंकाळी ताबुत विसर्जन होऊन मोहरमची सांगता होईल, अशी माहिती इचलकरंजी मोहरम कमिटीच्या वतीने देण्यात आली आहे.

## मणिपूरमध्ये शस्त्रास्त्रे जप्त

**इम्फाळ :** मणिपूरच्या चार डोंगराळ जिल्ह्यांमध्ये राबविलेल्या शोधमोहिमेत सुरक्षा दलांनी २०० हून अधिक शस्त्रे जप्त केली. त्यामध्ये बंदुका आणि युद्धाशी संबंधित साहित्य आहे.

तेंग्नौपाल, कांगपोक्पी, चंदेल आणि चुराचंदपूर जिल्ह्यांच्या डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात शस्त्रे, दारूगोळा आणि इतर युद्ध साहित्य लपवल्याची माहिती अतिरिक्त पोलिस महासंचालक लाहरी दोरजी लहाटू यांना मिळाली होती. त्यानुसार गुरुवारी मध्यरात्री ते शुक्रवार सकाळपर्यंत सुरक्षा दलाकडून संयुक्तमोहीम राबविण्यात आली. संयुक्त कारवाईत जप्त केलेल्या शस्त्रांमध्ये २१ इन्सास रायफल्स, ११ एके सीरिज, २६ एसएलआर, नऊ पिस्तूल १०९ दारूगोळे यांचा समावेश आहे.

# शिराळ्यातील भटकी कुत्री ठरताहेत धोक्याची घंटा

## कुत्र्यांची शिकार करण्यासाठी बिबटे लोकवस्तीत घुसण्याची शक्यता

केसरी वृत्तसेवा

**शिराळा :** शहराच्या आसपासचं बिबट्याचे सावट आणि शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या पाहता शहरात धोक्याची घंटा वाजू लागली आहे. या कुत्र्यांची शिकार करण्यासाठी बिबटे लोकवस्तीत घुसण्याची शक्यता असतानाही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने सर्वसामान्योमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

बिबट्याचे मुख्य भक्ष्य शेळ्या, मेंढ्या व कुत्री आहेत. शिराळ्याच्या आसपास बिबट्याने अनेक वाडीवस्तीवर हल्ले केले आहेत. शिराळा शहरात भक्तीच्या नावावर भटक्या कुत्र्यांचा सांभाळ करणारी लोकही आहेत. त्यांनी भटक्या कुत्र्यांचा सांभाळ करावा, परंतु त्यामुळे इतरांना त्रास होऊ नये याची काळजी घ्यावी. गावाच्या बाहेर त्यांचा सांभाळ करून बंदोबस्त केला पाहिजे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. भटक्या कुत्र्यांचा रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या लोकांना व वाहनचालकांना त्रास होत आहे. तसेच ही कुत्री शहरातील पाळीव कोंबड्या, मांजरांना मोठ्या प्रमाणात आपले भक्ष्य बनवत आहेत. शिराळा शहरातील मोकाट व भटक्या कुत्र्यांमुळे शहरात बिबट्याचा मानवी वस्तीत प्रवेश होण्याची शक्यता असल्याने या भटक्या कुत्र्यांचा नगरपंचायत प्रशासनाने लवकरात लवकर बंदोबस्त करावा, अशी मागणी सध्या जोर धरू लागली आहे.

काही महिन्यांपासून बिबट्याने शिराळा शहराच्या अवघ्या अर्ध्या किलोमीटरपासून शेळ्या, मेंढ्या, कोंबडी तसेच पाळी व भटक्या कुत्र्यांच्यावर हल्ला केल्याचे पहावयास मिळाले. शिराळा व खेडगावच्या हद्दीवर तसेच शिराळा शहराच्या हाकेच्या अंतरावर काही दिवसांपूर्वी दहा ते पंधरा शेळ्या-मेंढ्यांचा बिबट्याने फडशा पाडला. तर अवघ्या एक-दोन किलोमीटर अंतरावरील उपवळे, कदमवाडी, कापरी, भाटशिरगांव आदी गावात बिबट्याने शेळ्या, मेंढ्या, कोंबडी तसेच कुत्र्यांवर अनेकवेळा हल्ला केला असून, यामध्ये अनेक जनावरांचे जीव गेले आहेत.

शिराळा शहरातील भटक्या कुत्र्यांमुळे बिबट्या शहरातील मानवी वस्तीत येण्याची शक्यता जाणकार व्यक्त करत आहेत. त्यामुळे शिराळा शहरातील भटक्या कुत्र्यांचा नगरपंचायत प्रशासनाने लवकरात लवकर बंदोबस्त करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.



शिराळा : शहरात अनेक ठिकाणी अशी भटकी कुत्री पाहायला मिळतात.

### विद्यार्थ्यांना धास्ती

शिराळा हे तालुक्याचे ठिकाण आहे. खेड्यापाड्यातील अनेकांना या ना त्या कारणाने दररोज शिराळ्याला यावे लागते. शहरातील भटकी कुत्री रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांच्या अंगावर धावून जातात. तसेच तर धावत्या दुचाकींच्या पाठीमागे लागतात. त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाहेरगावातून शाळा-कॉलेजला येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनातही या कुत्र्यांची धास्ती कायम असते.

# वयोवृद्ध आई-वडिलांना मुलांकडून जिवे मारण्याची धमकी

केसरी वृत्तसेवा

**दिघंची :** येथील वयोवृद्ध आई-वडिलांना शेतात आल्यास जिवे मारण्याची धमकी मुलांकडून देण्यात आली. याप्रकरणी न्याय मिळावा, या मागणीचे निवेदन पोलीस अधीक्षक यांना देण्यात आले. दिघंची येथे महादेव मुगुटराव काटकर (वय ७७) व त्यांची पत्नी राहत आहे. त्यांना दोन मुले संजय व ज्ञानेश्वर आहेत. महादेव काटकर व त्यांच्या पत्नी मोलमजुरी करून स्वतःचा उदरनिर्वाह करीत आहेत. त्यांची वडिलोपार्जित जमीन पावणेदोन एकर व स्वकष्टाने घेतलेली पावणेतीन एकर जमीन आहे. ही सर्व जमीन मुले कसत आहेत. त्यातील कोणतेही उत्पन्न ते आम्हाला देत नाहीत व आमचा सांभाळ करत नाहीत. उलट आम्हालाच शिवीगाळ मारहाण करून जिवे मारण्याची धमकी देत आहेत, असे निवेदनात म्हटले आहे.

# शिराळा तालुक्यात १६.३ मि.मी. पावसाची नोंद

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी ३.७ मि. मी. पावसाची नोंद झाली असून, शिराळा तालुक्यात सर्वाधिक १६.३ मि. मी. पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात गेल्या २४ तासात पडलेला पाऊस व कंसात १ जूनपासून आत्तापर्यंत पडलेल्या पावसाची तालुकानिहाय आकडेवारी मि. मी.मध्ये पुढीलप्रमाणे. मिरज ४.४ (१२४.४), जत १.२ (९०.५), खानापूर, विटा ०.९ (९५.८), वाळवा-इस्लामपूर ३.५ (२१५.३), तासगाव १.५ (११४), शिराळा १६.३ (५२०.१), आटपाडी ०.६ (९०.२), कवठेमहांकाळ १.८ (१००.६), पलूस १.६ (१७९.१), कडेगाव ३.३ (१४६.४).


## जाहीर नोटीस

सर्व लोकांचे माहितीकरीता या नोटीसीने कळविणेत येते की कसबा उत्तुर, ता. आजरा, जि. कोल्हापूर या गावचे हद्दीतील गट क्रमांक ५१६/१ याचे एकुण क्षेत्र हेक्टर ०२-५७.१० आर, आकार रूपये १६-७८ पैसे या जमिनीपैकी श्री. घुलाप्पा शंकरेप्पा केरी यांचे मालकी वहिवाटीतील क्षेत्र हेक्टर ०-४० आर, आकार रूपये ०२-७१ पैसे या जमीनीच्या चतु:सिमा :- पुर्वेस - सरकारी रस्ता, पश्चिमेस - श्री. आरती अरूण हुन्नरगी व ज्ञानदा सागर चौगुले व राधिका साजन कळसकर व आरती आरूण हुनूरगे यांची शेतजमीन, दक्षिणेस - सदर गट क्रमांक ५१६/१ मधिल श्री. सतिश सदाशिव कल्लट्टी व श्री. प्रविण महालिंगाप्पा मुंडगनुर यांची शेतजमीन, व उत्तरेस - रहिमान रसुल नाईकवाडे यांची जमीन येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही श्री. घुलाप्पा शंकरेप्पा केरी यांचे मालकी कब्जे वहिवाटीची जमिन आहे. वर नमूद मिळकत आमचे अशिल श्री. घुलाप्पा शंकरेप्पा केरी यांचेकडून खरेदी घेणार आहेत. तशी मिळकत धारक व आमचे अशिल यांचे दरम्यान चर्चा झालेली आहे व संचकारपत्रही झालेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना वर नमूद मिळकतीचे धारक श्री. घुलाप्पा शंकरेप्पा केरी यांनी दिला आहे.

तथापी सदर मिळकतीवर इतर कोणत्याही संस्थेचा अगर व्यक्तीचा कर्ज बोजा, तारण, गहाण, करार, बक्षिस, पोटगीहक्क अथवा चतु:सिमेबाबत अधिकार असलेस त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन त्याबाबत सात दिवसांचे आत खाली नमूद पत्यावर प्रत्यक्ष भेट घेवुन त्यांचे हक्काची खात्री करून द्यावी. जर वर नमूद मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी आहे असे समजुन आमचे अशिल ठरलेप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणचीही कसलीही तकार आलेस ती आमचे अशिलांचे हक्कावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी म्हणुन दिली जाहीर नोटीस आज मुक्काम आजरा

**ॲड. सचिन शिवाजीराव इंजल**

तारीख : ०४/०७/२०२५ — रा. शिवाजीनगर, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर.
मो.नं. ९४२०७७७७६०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांचे माहितीकरीता या नोटीसीने कळविणेत येते की, कसबा उत्तुर, ता. आजरा, जि. कोल्हापूर या गावचे हद्दीतील गट क्रमांक ५१६/१ याचे एकुण क्षेत्र हेक्टर ०२-५७.१० आर, आकार रूपये १६-७८ पैसे या जमिनीपैकी श्री. सतिश सदाशिव कल्लट्टी व श्री. प्रविण महालिंगाप्पा मुंडगनुर यांचे मालकी वहिवाटीतील क्षेत्र हेक्टर ०-४० आर, आकार रूपये ०२-७१ पैसे या जमीनीच्या चतुःसिमा :- पुर्वेस - सरकारी रस्ता, पश्चिमेस - श्री. आरती अरूण हुन्नरगी व ज्ञानदा सागर चौगुले व राधिका साजन कळसकर व आरती आरूण हुनूरगे यांची शेतजमीन, दक्षिणेस - सदर गट क्रमांक ५१६/१ मधील प्रितम देशभुषण देशमाने यांची शेतजमीन, व उत्तरेस - श्री. घुलाप्पा शंकरेप्पा केरी यांची जमीन येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत ही श्री. सतिश सदाशिव कल्लट्टी व श्री. प्रविण महालिंगाप्पा मुंडगनुर यांचे मालकी कब्जे वहिवाटीची जमिन आहे. वर नमूद मिळकत आमचे अशिल श्री. सतिश सदाशिव कल्लट्टी व श्री. प्रविण महालिंगाप्पा मुंडगनुर यांचेकडून खरेदी घेणार आहेत. तशी मिळकत धारक व आमचे अशिल यांचे दरम्यान चर्चा झालेली आहे व संचकारपत्रही झालेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना वर नमूद मिळकतीचे धारक श्री. सतिश सदाशिव कल्लट्टी व श्री. प्रविण महालिंगाप्पा मुंडगनुर यांनी दिला आहे.

तथापी सदर मिळकतीवर इतर कोणत्याही संस्थेचा अगर व्यक्तीचा कर्ज बोजा, तारण गहाण, करार, बक्षिस, पोटगीहक्क अथवा चतुःसिमेबाबत अधिकार असलेस त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन त्याबाबत सात दिवसांचे आत खाली नमूद पत्यावर प्रत्यक्ष भेट घेवुन त्यांचे हक्काची खात्री करून द्यावी. जर वर नमूद मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी आहे असे समजुन आमचे अशिल ठरलेप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणचीही कसलीही तकार आलेस ती आमचे अशिलांचे हक्कावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी म्हणुन दिली जाहीर नोटीस आज मुक्काम आजरा

**ॲड. सचिन शिवाजीराव इंजल**

तारीख : ०४/०७/२०२५ — रा. शिवाजीनगर, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर.
मो.नं. ९४२०७७७७६०

## जाहीर नोटीस

**ॲड. रमाकांत मारुती पाटील**
दिवाणी कि. अर्ज नं. १४४/२०२५

**सांगली येथील मे. सि. जज्ञ सि. डी. सो, यांचे कोर्टात**

१) श्री. सचिन वसंत लाटवडे — **अर्जदार**

**विरुध्द**

२) कोणीही नाही — **जाबदार**

१) ज्याअर्थी यातील अर्जदार सचिन वसंत लाटवडे, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली हे कायमस्वरूपी नमूद पत्यावर राहतात. अर्जदार सचिन वसंत लाटवडे यांना त्यांची आत्या आक्काताई शिवाप्पा लाटवडे यांनी दि. १८/०३/२०१२ रोजी १०० रू. च्या स्टँप वरती मृत्यूपत्र करून दिलेले आहे त्यामध्ये कवठेमहांकाळ येथील भूमापन क्र. १४३० मधील क्षेत्र ० हे. १.५० आर क्षेत्र तसेच आक्काताई शिवाप्पा लाटवडे या शिक्षीका असल्यामुळे त्यांच्या फंडाची सर्व रक्कम ही अर्जदार यांना मृत्यूपत्राव्दारे दिलेली आहे.

२) त्यानंतर आक्काताई शिवाप्पा लाटवडे या कोरोना काळात दि. ०५/११/२०२१ रोजी मिरज सिव्हील येथे अकस्मात मयत झाल्या आहेत. यातील अर्जदार यांनी आक्काताई शिवाप्पा लाटवडे यांनी दि. १८/०३/२०१२ रोजी त्यांना दिलेल्या शेवटच्या मृत्यूपत्राचा प्रोबेट दाखला प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात ॲडव्होकेट रमाकांत पाटील यांनी अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांच्या मते आक्काताई शिवाप्पा लाटवडे यांनी अर्जदार यांना दिलेले हे शेवटचे मृत्यूपत्र आहे. त्यामुळे त्यांना प्रोबेट दाखला मिळणे गरजेचे आहे. यदाकदाचीत आक्काताई शिवाप्पा लाटवडे यांनी केलेल्या मृत्यूपत्रा बाबत कोणाची काही तक्रार अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी न्यायालयाच्या पुढील नेमणूक तारीख ०२/०८/२०२५ रोजी स्वतः अथवा वकिलामार्फत कोर्टात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. जर कोणाची काही तक्रार वर नमूद तारखे दिवशी न आल्यास आक्काताई शिवाप्पा लाटवडे यांनी अर्जदार यांना दिलेल्या वर नमूद मृत्यूपत्राप्रमाणे प्रोबेट दाखला दिला जाईल त्यानंतर कोणाची काही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली कोर्टा मार्फत जाहीर नोटीस.

सही/- **ज्यु. क्लार्क** सि. जज्ञ सि. डी. सांगली — (शिक्का) — सही/- **अधिक्षक** सि. जज्ञ सि. डी. सांगली



**एल्&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल्&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 00 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** कोल्हापूर

L&T Finance

## गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | सुरक्षित कर्ज | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. जयेश गुंडेशा<br>2. रुपाली जयेश गुंडेशा | मालमत्तेचा सर्व भाग आणि पार्सल पत्ता: शहर सर्वेक्षण क्रमांक 332/2 असलेली मालमत्ता ज्यापैकी प्लॉट क्रमांक 87b आहे व ज्याचा जुना रा.स.क्रमांक 640/5 आहे, प्लॉट क्रमांक B-87, क्षेत्रफळ 315 चौ.मी. असून त्यावर इमारत आहे. हि मालमत्ता 'b' वार्ड, जवाहर नगर, के. बावडा कोल्हापूर, महाराष्ट्र, 416008 येथे आहे. जी बांधलेल्या इमारत फिक्स्चरसह व सर्व हक्कांसह आहे.<br>जमिनीच्या सीमा: पूर्व - प्लॉट क्रमांक B-109; पश्चिम - रस्ता; उत्तर - प्लॉट क्रमांक B-88,; दक्षिण - चा प्लॉट क्रमांक B-86 | H00984190221045131 / H00984190221073901 | 10 मार्च 2025 | रु. 11,18,336.30/- | 12-08-2022 च्या मागणी सूचनेनुसार 11-08-2022 रोजी एकूण थकबाकी रु. 1,64,40,393 /- आहे. | रु. 1,11,83,363 /- | सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 A.M ते 5.30 P.M या वेळेत पूर्व भेटीसह. | 12.08.2025 रोजी दुपारी 12:30 ते दुपारी 2.00 पर्यंत |
| 1. रोहित किशोर कुलकर्णी<br>2. रसिका रोहित कुलकर्णी<br>3. अनुराधा किशोर कुलकर्णी<br>4. गौरी कुलकर्णी (मृत सह-कर्जदार राहुल किशोर कुलकर्णी यांचे कायदेशीर वारस म्हणून)<br>5. मृण्मयी कुलकर्णी (मृत सह-कर्जदार राहुल किशोर कुलकर्णी यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांच्या पालक गौरी कुलकर्णी यांच्या मार्फत) | मालमत्तेचा सर्व भाग आणि पार्सल पत्ता: फ्लॅट क्रमांक 406, 55.50 चौ. मीटर चटई क्षेत्र, 54.48 चौ. मीटर बांधलेले क्षेत्र, आणि 75.90 चौ. मीटर सील करण्यायोग्य क्षेत्र, चौथ्या मजल्यावर, संकल्प सिद्धी अपार्टमेंट बिल्डिंग G या इमारतीत स्थित आहे. हे आर. एस. 298/3/B येथे बांधलेले आहे, व A वॉर्ड कलामंबे, कोल्हापुर साँगली महाराष्ट्र 416416 कोल्हापूर महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीत देखील आहे.<br>सीमा: पूर्व - प्रकल्पाचा अंतर्गत रस्ता; पश्चिम - फ्लॅट क्रमांक 403; उत्तर - फ्लॅट क्रमांक 405; दक्षिण - फ्लॅट क्रमांक 401 | KOHHL18000256 / KOHHL18000250 | 4 एप्रिल 2025 | रु. 2,22,092/- | 18-08-2022 च्या मागणी सूचनेनुसार 16-08-2022 रोजी एकूण थकबाकी रु. 91,10,139.05 आहे. | रु. 22,20,920/- | सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते 5.30 या वेळेत प | 12.08.2025 रोजी दुपारी 12:30 ते दुपारी 2.00 पर्यंत |

### सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **11/08/2025** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी एलटीएफ द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **12/08/2025** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **13/08/2025** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या तपासणीसाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकतात म्हणजेच **नाव - श्री शेखर काळे, एल&टी फायनान्स लिमिटेड, आणि संतोष तिवारी, एल&टी फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098, संपर्क क्रमांक 0222-68076666.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकारू/नाकारू शकतो/सुधारू शकतो/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 05.07.2025
**ठिकाण:** कोल्हापूर

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल्&टी फायनान्स लिमिटेड


## थोडक्यात महत्त्वाचे



मुख्य रस्त्यावरील अनधिकृत केबिन व दुकानाबाहेर लावलेल्या साहित्यावर कारवाई करण्यात आली. (छाया : मालोजी केरकर)

# अनधिकृत फुलवाले केबिनवर मनपा पथकामार्फत कारवाई

### ६ केबिन, ३ हातगाड्या, ३८ फुले स्टॅन्ड, २६ छत्र्या जप्त

केसरी वृत्तसेवा

**कोल्हापूर :** महापालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथकामार्फत पर्ल हॉटेल ते महादेव मंदिर या पसिरातील मुख रस्त्यावरील अनधिकृत केबिन व दुकानाबाहेर लावलेल्या साहित्यावर कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये ६ केबिन, ३ हातगाड्या, ३८ फुले स्टॅन्ड, २६ छत्र्या जप्त करण्यात आल्या. तसेच २३ अनधिकृत केबिन बाहेरील छपऱ्या काढण्यात आल्या, तर ७ केबिन स्वत: मालकांनी काढून घेतल्या. ही कारवाई प्रशासक के. मंजूलक्ष्मी, अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, सहा. आयुक्त स्वाती दुधाणे, शहर अभियंता हर्षजीत घाटगे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण अधीक्षक विलास साळूंखे, सहायक अधीक्षक प्रफुल्ल कांबळे, कनिष्ठ लिपिक सजन नागलोत, मुकादम रवींद्र कांबळे व अतिक्रमण निर्मूलन पथकाचे कर्मचारी यांच्यामार्फत करण्यात आली. शहरामध्ये अनाधिकृत फेरीवाले व रोडवरील दुकानाबाहेर लावलेल्या अनाधिकृत शेडवर महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाच्यावतीने येथून पुढेही कडक कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित दुकान धारकांनी व फेरीवाल्यांनी त्यांचे अनाधिकृत असलेले बांधकाम स्वत: काढून घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.




समडोळी येथील आदर्श शिक्षण संस्थेच्या नूतन पदाधिकारी यांचा सत्कार करताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब पाटील आदी मान्यवर.

# समडोळी आदर्श शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी त्रिशला पाटील

### उपाध्यक्षपदी अशोक चव्हाण

केसरी वृत्तसेवा

**कसबे डिग्रज :** समडोळी येथील गेली सुमारे ३६ वर्षे अविरतपणे ज्ञानदानाचे कार्य करत असलेल्या आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ समडोळीच्या अध्यक्षपदी त्रिशला संजय पाटील (यड्रावकर), तर उपाध्यक्षपदी अशोक चव्हाण व सचिवपदी रवींद्र समगोंडा पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. इतर सदस्य पुढीलप्रमाणे : बाबासाहेब पाटील (संस्थापक व माजी अध्यक्ष) सागर पाटील, रवींद्र पाटील, संजय बेले, सचिन रुगे, वृषभनाथ पाटील, सचिन ढोले (कार्यवाह). नूतन सदस्यांचा सत्कार बाबासाहेब पाटील, संस्थापक अध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ समडोळी, बॉईज अँड गर्ल्स हायस्कूल समडोळी व न्यू आदर्श विद्यामंदिर समडोळीमार्फत अभिनंदन व सर्व नूतन संचालकांचा सत्कार दोन्ही विद्यालयांच्या वतीने करण्यात आला. स्वागत संस्थेचे सचिव रवींद्र पाटील यांनी केले. आभार मुख्याध्यापिका अनिता नवले यांनी मानले. यावेळी संस्थेचे सर्व संचालक, पदाधिकारी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.




वारकऱ्यांना फळे व फराळाचे वाटप प्रसंगी सागर माने, विकास जाधव, अमोल धोत्रे, वनिता पाटोळे, अनुराग सरगर आदी.

# दत्ता पाटोळे यांच्या स्मरणार्थ वारकऱ्यांना फळे, फराळाचे वाटप

केसरी वृत्तसेवा

**कुपवाड :** पंढरपूरकडे पायी दिंडीत निघालेल्या वारकऱ्यांना फळे व फराळाचे वाटप करण्यात आले. कै. दत्ता अण्णा पाटोळे यांच्या स्मरणार्थ, राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी (अजित पवार गट) ओबीसी विभाग प्रदेश सरचिटणीस सागर माने यांच्या आयोजनाखाली व अण्णा ग्रुप वाघमोडेनगर, कुपवाड यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. सांगली शहर व जिल्ह्यातून पंढरपूरकडे पायी दिंडीत निघालेल्या वारकऱ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात आला. वारकऱ्यांना ऊर्जा मिळावी, या हेतूने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ओबीसी विभागाचे पदाधिकारी विकास जाधव, अमोल धोत्रे, वनिता पाटोळे, अनुराग सरगर, मधुकर मस्के, संतोष साळुंके, स्वप्नील माने, अभिषेक पाटोळे, सर्फराज समलेवाले, कुमार पाटोळे आदी उपस्थित होते.

## अरुणाचलमध्ये दोन बॉम्ब निकामी

**इटानगर :** अरुणाचल प्रदेशातील कामले जिल्ह्यातील रिग्यू गावात भारतीय हवाई दलाच्या पथकाने दोन बॉम्ब यशस्वीरीत्या निकामी केले. हे बॉम्ब भारतीय हवाई दलाच्या डोलम फायरिंग रेंजपासून काही किलोमीटर अंतरावर आढळले होते.